**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या दोन सूचना आलेल्या आहेत. एक सूचना सकाळी 9.30 वाजता सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, चंद्रकांत पाटील, जयंत प्र. पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, ॲड. आशिष शेलार, डॉ. दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, ॲड. अनिल परब, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री रामनाथ मोते, विनायक राऊत, भगवानराव साळुंखे, नागो पुंडलिक गाणार, भाई गिरकर यांनी दिलेली आहे. दुसरी सूचना सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, कपिल पाटील यांनी दिलेली आहे. "राज्यात भीषण दुष्काळ असताना जनता पाण्यासाठी वणवण फिरत असून काही शेतकरी हक्काचे पाणी मिळावे यासाठी गेल्या 55 दिवसांपासून उपोषण करीत असणे, राज्याचे उप मुख्यमंत्री दौऱ्यावर गेले असता त्यांनी त्यांच्या जखमेवर मीठ चोळणारे वक्तव्य करणे" या विषयाच्या संदर्भात उपरोक्त दोन 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचना आलेल्या आहेत. ज्या सन्माननीय सदस्यांनी या सूचना दिलेल्या आहेत त्यापैकी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांना मी सांगू इच्छितो की, हा विषय 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा कसा होतो या बाबतीत आपले मत मांडावे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण 289 च्या प्रस्तावाची सूचना पुकारलेली आहे.

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या दोन सूचना आलेल्या आहेत तसेच नियम 47 अन्वये वैयक्तिक स्पष्टीकरणाबाबत माननीय उप मुख्यमंत्री यांनी सूचना दिलेली असून त्यांना वैयक्तिक स्पष्टीकरण करावयाचे आहे आणि तो त्यांचा अधिकार आहे. तो अधिकार कोणालाही नाकारता येणार नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विषय तोच असल्यामुळे या विषयावर आम्हाला बोलू द्यावे.

( दोन्ही बाजूचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

**सभापती** : महाराष्ट्र विधान परिषद नियम 47 मध्ये असे नमूद केले आहे की, "कोणत्याही सदस्याला कोणत्याही वेळी, सभापतींच्या परवानगीने वैयक्तिक स्पष्टीकरण, मग त्यासंबंधीचा प्रश्न त्यावेळी विधान परिषदेपुढे नसला, तरीही करता येईल; मात्र असे करताना तो कोणताही विवाद्य विषय पुढे आणणार नाही. तसेच, अशा स्पष्टीकरणावर कोणतीही चर्चा करण्याला परवानगी देता येणार नाही. अशा पध्दतीने हा नियम स्पष्ट आहे. कोणत्याही वेळेला त्यांना वैयक्तिक स्पष्टीकरण करता येते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण मला म्हणणे मांडण्यास सुरुवात करावयास सांगितले होते.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

**पृ. शी.** : दौऱ्यावर असताना केलेले वक्तव्य

**मु.शी.** : दौऱ्यावर असताना केलेल्या वक्तव्यासंबंधी श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील वैयक्तिक स्पष्टीकरण करीत आहे.

सभापती महोदय, राज्यातील.....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आमचे म्हणणे मांडून झाल्यावर माननीय उप मुख्यमंत्र्यांना बोलू द्यावे.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सर्वसाधारणपणे आपण नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना प्रश्नोत्तराच्या तासानंतर घेतो. परंतु अपवाद म्हणून मी नियम 289 अन्वयेची सूचना प्रथम घेतलेली आहे. ही वस्तुस्थिती असली तरी ज्यावेळी नियम 47 अन्वये निवेदन करण्याची परवानगी मागितली जाते त्यावेळी त्यांना परवानगी देणे आवश्यक आहे, अशा प्रकारची नियमात तरतूद आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी नियम 47 अन्वये निवेदन करु देण्याची मला विनंती केली होती. त्यांनी केलेली विनंती योग्य आहे असे माझे मत आहे. त्यामुळे त्यांना निवेदन करण्यासाठी परवानगी देण्याचे मी ठरविलेले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला आपल्याला विनंती करावयाची आहे. आम्ही आपल्याकडे याच विषयासंबंधी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्यामुळे मला प्रथम.....

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मला या विषयासंबंधी बोलावयाचे आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. आपण मघाशी सन्माननीय विरोधी पक्ष नेते व इतर सन्माननीय सदस्यांनी दिलेली नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना वाचून दाखविली आहे. त्याबाबत आपण आपले मतही व्यक्त केलेले आहे. त्यानंतर सभागृहाचे नेते व माननीय उप मुख्यमंत्री यांनी निवेदन करण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर आपण त्यांना निवेदन करण्याची परवानगी दिली आहे. आजपर्यंतच्या प्रथा व परंपरा अशा आहेत की, सभागृहाच्या नेत्यांनी एखाद्या बाबीसंबंधी घोषणा किंवा निवेदन करण्याची विनंती केल्यानंतर सभागृहासमोरील कामकाज बाजूला ठेवून निवेदन करण्याची परवानगी दिली जाते. आता आपण त्यांना निवेदन करण्याची संधी दिलेली आहे. माननीय उप मुख्यमंत्री या सदनाचे नेते आहेत. त्यामुळे त्यांना निवेदन करण्याची संधी प्रथम देणे आवश्यक आहे. सभागृहाचे नेते निवेदन करण्यास उभे असताना त्यांच्या निवेदनात व्यत्यय आणणे बरोबर नाही.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या सभागृहाच्या कामकाजामध्ये.....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. नियम 47 अन्वये....

( दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकमेकांशी बोलत असतात. )

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, नियम 47 मधील तरतूद मी वाचून दाखवितो. या नियमात असे नमूद केले आहे की, "कोणत्याही सदस्याला, कोणत्याही वेळी....सन्माननीय उप मुख्यमंत्री हे या सभागृहाचे सदस्य आहेत का ? या नियमात "कोणत्याही सदस्याला" असे म्हटलेले आहे.....

**सभापती** : सन्माननीय उप मुख्यमंत्री हे या सभागृहाचे नेते आहेत. हे नक्की आहे....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री हे या सदनाचे सदस्य नसल्यामुळे त्यांनी विधानसभेमध्ये निवेदन करावे. त्यांना या सभागृहात निवेदन करता येणार नाही.

**सभापती** : सन्माननीय उप मुख्यमंत्री हे या सदनाचे नेते आहेत.

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलत असतात. )

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याबाबत....

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय सभापतींबरोबर बोलत असतात. )

श्री.अजित पवार : सभापती महोदय, या राज्याचे माननीय मुख्यमंत्री हे विधानसभेचे सदस्य नाहीत. परंतु ते सभागृहाचे नेते आहेत. त्याच पध्दतीने मी देखील या सभागृहाचा नेता आहे. मी निवेदन करण्यासाठी उभा असल्यामुळे मला आपण बोलण्याची संधी द्यावी.

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलत असतात. )

**सभापती** : सभागृहामधील गोंधळाच्या वातावरणामध्ये मला कामकाज करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज 20 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.09 वाजता 20 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम..........

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमावलीत पृष्ठ क्रमांक 2 वरील नियम क्रमांक 2 (जे-1) आपल्या नम्रपणे निदर्शनास आणून देऊ इच्छितो. नियम 2 (जे-1) असा आहे :-

2 (जे-1) "सभागृह नेता" म्हणजे, मुख्यमंत्री किंवा मुख्यमंत्र्यानी नियुक्त केलला कोणताही मंत्री ;

पुढे नियम (जे-2) मध्ये असे नमूद केलेले आहे की, "सभागृह उप नेता" म्हणजे, मुख्यमंत्र्यांनी नियुक्त केलेला सभागृहाचा सदस्य असलेला कोणताही मंत्री किंवा कोणताही सदस्य;"

नियम (के) मध्ये असे नमूद केलेले आहे की, "सदस्य" म्हणजे विधानपरिषदेचा सदस्य :

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे............

परंतु सदस्य नसलेला मंत्री व महाअधिवक्ता यांना, विधानपरिषदेच्या कामात भाषण करणे, प्रस्ताव मांडणे व इतर रितीने भाग घेणे, या प्रयोजनासाठी आणि तिच्या ज्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून त्यास नामनिर्दिष्ट केले असेल त्या समितीत भाषण करणे किंवा तिच्या कामात इतर रितीने भाग घेणे या प्रयोजनासाठी सदस्य म्हणून समजण्यात येईल."

म्हणजे नियमामध्ये स्पष्टपणे उल्लेख असताना आणि सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री यांना प्रथम निवेदन करण्याची परवानगी दिली आहे, ती नियमानुसार आहे. म्हणून माझी विनंती आहे की, आपण प्रथम सभागृह नेत्यांना निवेदन करण्यास अनुमती द्यावी, त्यानंतर माननीय विरोधी पक्षनेत्यांना जे काही भाष्य करायचे असेल ते करु द्यावे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या सभागृहामध्ये एक अत्यंत महत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या वतीने नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेवर बोलण्यास पहिल्यांदा आपण माननीय विरोधी पक्षनेत्यांना संधी दिली. आता माननीय विरोधी पक्षनेत्यांना प्रथम बोलायला संधी द्यायची की माननीय सभागृह नेत्यांना प्रथम संधी द्यायची असा प्रश्न निर्माण झाला आहे. सभागृहाच्या नेत्यांनी नियम 47 अन्वये वैयक्तिक स्पष्टीकरण करण्यासाठी अनुमती मागितली आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांना वैयक्तिक स्पष्टीकरण करण्यासाठी दिलेली अनुमती कशी योग्य आहे हे मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

सुरुवातीला नियम 289 अन्वयेच्या सूचनेसंबंधीच्या प्रस्तावात जो विषय मांडण्यात आला त्यात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहाबाहेर जे काही स्टेटमेंट केले त्या संदर्भात उल्लेख झालेला आहे. त्या प्रस्तावामध्ये माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या नावाचा उल्लेख केला गेला, त्याच वेळेला त्यांना वैयक्तिक स्पष्टीकरण करण्याचा हक्क प्राप्त झाला. हा हक्क प्राप्त झाल्याबरोबर माननीय विरोधी पक्षनेत्यांना थांबवून आपण नियम 47 अन्वये माननीय उप मुख्यमंत्र्यांना वैयक्तिक स्पष्टीकरण करण्यास संधी दिली. याचा अर्थ माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी सांगितल्याप्रमाणे माननीय उप मुख्यमंत्र्यांचा हक्क कसा प्रस्थापित होतो हे सिध्द झाले आहे.

माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, माननीय उपमुख्यमंत्री हे या सभागृहाचे सदस्य नाहीत. परंतु या सभागृहाचे नेते या नात्याने त्यांचा हक्क प्रस्थापित होतो त्यामुळेच माननीय विरोधी पक्षनेत्यांना थांबवून आपण सभागृहाच्या नेत्यांना नियम 47 अन्वये स्पष्टीकरण करण्यास दिलेली नियमाला धरुन आहे हे मला निदर्शनास आणून द्यायचे आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाच्या बाकावरील माननीय सदस्य ज्या तावातावाने सभागृहात बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत तीच भूमिका त्यांनी काल स्वीकारली असती तर राज्यातील जनतेला दिलासा मिळाला असता. काही गोष्टी राजकारणाच्या पलीकडे जाऊन बोलायच्या असतात. मला नियमाबाबतचा मुद्दा मांडावयाचा आहे. आपण नियम 47 अन्वये स्पष्टीकरण करण्यास परवानगी दिली आहे. नियम 47 मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, कोणत्याही सदस्याला कोणत्याही वेळी सभापतींच्या परवानगीने वैयक्तिक स्पष्टीकरण करता येईल.

माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी उल्लेख केलेल्या नियम पुस्तिकेतील पृष्ठ क्रमांक-2 वर नमूद केल्याप्रमाणे "(के) 'सदस्य' म्हणजे विधानपरिषदेच्या सदस्य; परंतु सदस्य नसलेला मंत्री व महाअधिवक्ता यांना, विधानपरिषदेच्या कामात भाषण करणे, प्रस्ताव मांडणे" म्हणजे मंत्री या नात्याने त्यांचा रोल आहे. सरकारच्या वतीने उत्तर देणे, धोरण मांडायचे असेल तर मंत्री म्हणून त्यांचा रोल बजावण्यास अनुमती आहे. या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्र्यांना मंत्री म्हणून नव्हे तर वैयक्तिक स्पष्टीकरण करावयाचे आहे.......(अडथळा).... हे बसून का बोलतात? उभे राहून माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्याबद्दल समर्थन करावयाचे आहे का? समर्थन करण्याची हिंमत करता का?.....(अडथळा)....यांचे समर्थन आहे का?.......(अडथळा)....मी नियमावर बोलत आहे....(अडथळा)... सभापती महोदय, मला दोन गोष्टी मांडू द्याव्यात.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**सभापती** : माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना बोलण्याकरिता अनुमती दिली आहे.

नंतर ई.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. लोकशाहीमध्ये विरोधी पक्षनेत्यांना महत्त्व आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्षनेते बोलत असताना सभागृहात शांतता राखणे आवश्यक आहे. कृपया आपण खाली बसावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते नियमावर बोलत आहेत. मी बसून होतो. सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य आणि विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य यांचे बोलणे सुरू होते. सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य दादागिरी करीत आहेत.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, येथे कोणीच दादागिरी करणार नाही.

(सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते पुढे येऊन मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी गप्प बसलो होतो.

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री यांच्या वागण्यावरून यांना कालच्या घटनेचा पश्चाताप झाला आहे, असे मला काही वाटत नाही. मी नियम 47 वाचत होतो. सन्माननीय सदस्य मला बोलू देणार नसतील तर ते काही योग्य नाही. चुकीचे यांनीच बोलायचे आणि तेच परत आम्हाला बोलू देणार नसतील तर ते काही योग्य नाही. नियम 47 वैयक्तिक स्पष्टीकरणाच्या संबंधी आहे. नियम पुस्तिकेतील पृष्ठ क्रमांक 2 वरील काही मजकूर वाचून दाखविण्यात आला. सदर वाचलेल्या मजकुरामध्ये वैयक्तिक स्पष्टीकरण नसून सरकारच्या कामाचा भाग आहे. मी नियम 289 मुव्ह केला आहे. नियम 289 म्हणजे सर्व नियम बाजूला ठेवून चर्चा करावी, असा आहे. आपण मला माझे मत मांडण्यास परवानगी दिली. परंतु, त्यानंतर माननीय उप मुख्यमंत्री म्हणाले की, त्यांना काही स्पष्टीकरण करावयाचे आहे. कदाचित माननीय मंत्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

श्री. भास्कर जाधव यांना माहीत नसेल की, स्पष्टीकरण करण्याच्या संदर्भातील पत्र अगोदरच माननीय सभापती यांच्याकडे गेले आहे. माननीय सभापती यांना नियम 289 चा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. आपल्याकडे स्पष्टीकरण करण्याच्या संदर्भातील पत्र व नियम 289 चा प्रस्ताव दोन्ही मिळाल्यानंतर आपण मला पहिल्यांदा बोलण्यास परवानगी दिली आणि तरीही माननीय मंत्री श्री. भास्कर जाधव यांची दादागिरी सुरू आहे. हे कसे चालेल ? सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज नियमाने चालणार आहे की नाही ? आपल्याकडे दोन्ही बाबी आल्या होत्या. आपण या संदर्भात उल्लेखही केला होता. आपण मला पहिल्यांदा बोलण्यास परवानगी दिली आणि तरीही सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य बोलू देत नाहीत. आपण या संदर्भात निर्णय द्यावा, असे मला वाटते.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, नियम 47 मध्ये वैयक्तिक स्पष्टीकरणाचा उल्लेख केला आहे. मी त्याचे रिपिटेशन करणार नाही. नियम 47 मध्ये म्हटले आहे की, "कोणत्याही सदस्याला कोणत्याही वेळी, सभापतींच्या परवानगीने ...." माननीय उप मुख्यमंत्री हे या सभागृहाचे सदस्य नाहीत असा सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उल्लेख केला. त्यावर सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी पृष्ठ 2 वरील (के) मधील सदस्यांची व्याख्या वाचून दाखविली. (के) मध्ये म्हटले आहे की, "'सदस्य' म्हणजे विधानपरिषदेचा सदस्य." नियम 47 खाली ज्या सदस्याला वैयक्तिक स्पष्टीकरण करायचे असेल, त्या सदस्याची व्याख्या पृष्ठ 2 वरील (के) मध्ये केली आहे की, सन्माननीय सदस्य हा विधानपरिषदेचा सदस्य असला पाहिजे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार हे विधानपरिषदेचे सदस्य नाहीत. त्यामुळे ते नियम 47 अन्वये बोलूच शकत नाहीत, असा माझा दावा आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, नियम पुस्तिकेतील पृष्ठ क्रमांक 29 वर नियम 47 दिला आहे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी पृष्ठ 2 वरील (के) वाचला आहे. सभापती महोदय, पृष्ठ 2 वरील (जे-1) मध्ये स्पष्ट दिले आहे की, 'सभागृह नेता' म्हणजे, मुख्यमंत्री किंवा मुख्यमंत्र्यांनी नियुक्त केलेला कोणताही मंत्री. मी सभागृहाचा नेता असल्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी

..3



MSK/ D/ MMP/ पूर्वी श्री. भोगले 11:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

स्वत: आपल्याकडे पत्र दिले आहे. त्यामुळे मी (जे-1) मध्ये बसतो. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, आपण मला स्पष्टीकरण करण्यास परवानगी द्यावी.

**सभापती** : होय.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, ....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य पुढे येऊन मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

( नंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे. मी माझा निर्णय अजून दिलेला नाही. मला निर्णय द्यावा लागेल.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

मी अजून त्यांना परवानगी दिलेली नाही. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे. ...... (गोंधळ) ...... अशा परिस्थिती सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.41 ते 12.00 वाजे पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्रीमती रणदिवे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वेळ 2.05

सभापती...

असे शब्द असतील तर ते मी कामकाजातून टाकून टाकतो.

श्री.विनायकराव मेटे : सभापती महोदय.....

**सभापती** : सदनाचा सभापती या नात्याने मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना म्हणून सांगू इच्छितो की, त्यांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यावेळी पहिल्यांदा मी यु-टयुब वर हे वक्तव्य वाचले तेव्हा ते माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचे वाटलेच नाही. याचे कारण माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार नेहमी "आम्ही शाहू, फुले, आंबेडकर, श्री.यशवंतराव चव्हाण, श्री.वसंतराव नाईक यांचे नाव घेतो. आमच्या वडिलधाऱ्यांनी राजकारणामध्ये काम करीत असताना सामाजिक बांधिलकीचे व्रत लक्षात घेऊन लोकांचे प्रश्न सोडविण्याचे सातत्याने काम केलेले आहे, अशा प्रकारचे वक्तव्य करतात. श्री.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष नुकतेच साजरे केले असून आता श्री.वसंतराव नाईक यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत आहोत. त्यांनी या राज्याला आदर्श घालून दिलेला आहे. त्यावरच सत्ताधारी आणि विरोधी बाजूकडील सन्माननीय सदस्य काम करीत आहेत. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचे वक्तव्य आल्यानंतर महाराष्ट्रातील वातावरण सभ्यत्येच्या दुष्काळाने पोळले, तोडले अकलेचे तारे..... (अडथळा).... सभापती महोदय, महाराष्ट्रात हे जे वातावरण निर्माण झाले आहे त्यासंबंधी एका वर्तमानपत्राने यूरिन घोटाळा असा शब्द प्रयोग केला आहे. विधान मंडळाचे अधिवेशन सुरू असल्यामुळे दुष्काळग्रस्त भागातील लोकांसाठी सरकारने दोन अश्रू ढाळले असते तर त्या भागातील लोकांना बरे वाटले असते, अशी जनतेची अपेक्षा होती. विधानमंडळाचे अमृत महोत्सव साजरा करताना जर अशा प्रकारचे वक्तव्य सत्ताधारी पक्षातील एका माननीय मंत्र्यांकडून झाल्यामुळे राज्यातील जनतेला त्याची लाज वाटते. हा अतिशय संवेदनशील विषय आहे. महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे जनतेमध्ये या शासनाविषयी, राजकीय व्यवस्थेसंबंधी प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे आजचे सर्व कामकाज बाजूला सारून माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी वक्तव्य करून जो अवमान केला त्यासंबंधी सभागृहात चर्चा झ ाली पाहिजे असे मला वाटते.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय.....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना बोलण्यास अनुमती दिलेली नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, कोणते वाक्य बोलावे, कोणते वाक्य बोलू नये...

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी तेच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांच्यासह अन्य माननीय सदस्य काय बोलले आहेत हे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सांगू इच्छितो की,.....

श्री.विनोद तावडे (बसून) : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सांगू इच्छितो की, माननीय सभापती उभे असताना सन्माननीय सदस्यांनी बसले पाहिजे असे त्यांच्या हातामध्ये असलेल्या नियम पुस्तिकेमध्ये लिहिलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहात काय बोलावे,कोणत्या भावना व्यक्त कराव्यात हे आता आम्हाला शिकवायला लागले तर कसे होईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त कराव्यात आणि त्यांनी आम्हाला देखील आमच्या भावना व्यक्त करू द्याव्यात.

यानंतर श्रीमती रणदिवे ...

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे.

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते बोलले आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.आशिष शेलार यांनी प्रत्येक वेळेला बोलले पाहिजे असे नाही.

या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी नियम 2-जे (1) अन्वये माननीय उप मुख्यमंत्री यांना सभागृहाचा नेता म्हणून नियुक्त केलेले आहे. त्याचप्रमाणे 2 (के) च्या परंतुका अन्वये सभागृहाचा सदस्य नसलेल्या मंत्र्यांस सभागृहाच्या सर्व कामकाजात भाग घेण्याचा अधिकार प्राप्त होतो. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जरी नियम 47 अन्वये माननीय उप मुख्यमंत्री यांना वैयक्तिक स्पष्टीकरण करण्यास विरोध केला असला तरी सभागृह नेता म्हणून मी त्यांना त्यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण करण्यासाठी अनुमती देत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण कोणत्या नियमानुसार त्यांना अनुमती दिलेली आहे?

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

**सभापती** : सभागृहाचा नेता म्हणून मी त्यांना वैयक्तिक स्पष्टीकरण करण्यास अनुमती देत आहे. सन्माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी आपले वैयक्तिक स्पष्टीकरण करावे.

जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: दौऱ्यावर असताना केलेले वक्तव्य

मु.शी.: दौऱ्यावर असताना केलेल्या वक्तव्यासंबंधी श्री.अजित पवार, उप मुख्यमंत्री यांचे वैयक्तिक स्पष्टीकरण

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील वैयक्तिक स्पष्टीकरण करीत आहे.

सभापती महोदय, राज्यातील दुष्काळ निवारणासाठी आणि दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी राज्य शासन अत्यंत गंभीर असून, राज्य शासनाच्या दृष्टीने हा विषय सर्वोच्च प्राधान्याचा आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पात आणि विधीमंडळातील चर्चेच्या वेळी आम्ही ही भूमिका वेळोवेळी स्पष्ट केली आहे. शनिवार, दिनांक 6 एप्रिल 2013 रोजी एका कार्यक्रमामध्ये मी केलेले वक्तव्य हे दुष्काळ ग्रस्तांबाबत नव्हते. तसेच कोणाच्याही भावना दुखावण्याचा माझा अजिबात हेतू नव्हता. ही गोष्ट खरी आहे की, मी शब्दांचा वापर जबाबदारीने करावयास पाहिजे होता. दुष्काळ निवारण्याच्या मोहिमेला माझ्या वक्तव्यामुळे बाधा पोहोचू नये अशी माझी मनापासून इच्छा आहे. तरीही संबंधित वक्तव्यामुळे राज्यातील जनतेच्या व सभागृहाच्या भावना दुखावल्या असल्यामुळे मी अत्यंत विनम्रपणे

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सर्वांची माफी मागतो. राज्यातील दुष्काळी भागातील जनतेला पाणी, जनावरांना चारा आणि विद्यार्थ्यांना शुल्क माफीसह दुष्काळ निवारणासाठी आवश्यक ती सर्व मदत उपलब्ध करुन देण्यासाठी शासन कटीबध्द असेल. दुष्काळग्रस्तांना मदत करण्याचे प्रयत्न यापुढेही अधिक जोमाने सुरु रहातील याची मी राज्यातील जनतेला आपल्या माध्यमातून ग्वाही देतो.

----

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात )

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत. त्या संदर्भातील माझे निर्णय सहसचिव वाचून दाखवतील.

सहसचिव : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी " धुळे येथील बेबीबाई चौधरी गेल्या कित्येक वर्षापासून चालवित असलेल्या कुंटणखान्याकडे पोलिसांनी केलेले दुर्लक्ष " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "राज्यातील महापालिकांनी व नगरपालिकांनी बी.पी.एड. किंवा बी.एड. (शारीरिक शिक्षण) यांच्या प्रवेश नियमावलीतील शिक्षक या पदावरील शाळेत शिकविण्याचा अध्यापन अनुभव सात वर्षे व क्रीडापर्यवेक्षक पदाचा अनुभव पाच वर्षे न केल्यामुळे राज्यातील शिक्षक व क्रीडा अधिकारी वर्ग-2 या पदापासून वंचित राहणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "शिक्षक सेवक योजनेंतर्गत तीन वर्षाच्या मानधनावरील सेवेनंतर नियमित वेतनश्रेणी अनुज्ञेय असूनही मागासवर्गीय शिक्षक सेवकांना मात्र ते केवळ अप्रशिक्षित आहेत या कारणास्तव वेतनश्रेणी्पासून वंचित ठेवणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, विजय गिरकर यांनी "दिनांक 4 जानेवारी, 2008 ते 18 डिसेंबर, 2009 या कालावधीत कार्यरत असलेल्या मुंबईच्या नगरपाल डॉ.इंदू सहानी यांची मुदत संपल्यानंतरही पदाच्या अधिकाराचा व सवलतीचा वापर करीत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सहसचिव......

93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "चिखली बेराळ ते जालना कन्हैय्यानगर या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे बंद पडलेले काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बसतात )

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची जी सूचना दिलेली आहे त्यावर बोलण्यासाठी मी त्यांना परवानगी दिलेली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण 93 च्या सूचना कशा वाचल्या ? 93 च्या सूचनांच्या अगोदर नियम 289 अन्वयेची सूचना वाचावयास पाहिजे होती

**सभापती** : प्रश्नोत्तराचा संपलेला आहे. मी सहसचिवांना आदेश दिले त्याप्रमाणे त्यांनी नियम 93 अन्वयेच्या सूचना वाचल्या आहेत. मी  माननीय विरोधी पक्ष नेत्यांना पुन्हा एकदा विचारु इच्छितो की, त्यांना नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेवर बोलायचे आहे काय ?

(गोंधळ )

सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन सहसचिवांनी वाचलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील मी मागे घेतला आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्यासूचनेवर त्यांना बोलायचे आहे काय ?

( गोंधळ )

मला काही अधिकार नाही काय ? मी पुन्हा एकदा सांगतो की सहसचिवांनी वाचलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निर्णय मागे घेण्यात आला आहे.

(गोंधळ )

मी सभागृहाची बैठक दुपारी 12.30 पर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.10 ते 12.30 पर्यंत स्थगित झाली. )

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : मी सभागृहाची बैठक दुपारी 1.30 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.31 ते 1.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----------

नंतर श्री.खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ पूर्वी श्री.बरवड 01:30

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**<u>माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यासंबंधी नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेबाबत</u>**

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी माझ्याकडे नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली होती. विषय या नियमामध्ये कसा बसतो याबाबत त्यांनी त्यांचे म्हणणे थोडक्यात मांडावे असे मी मघाशी सांगितले होते. त्यानुसार ते बोलण्यासाठी उभे राहिले होते. त्या दरम्यानच सभागृहाचे नेते व सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी नियम 47 अन्वये निवेदन करण्याची परवानगी मागितल्यावर मी त्यांना परवानगी दिली होती. त्याप्रमाणे त्यांनी सभागृहात निवेदन केलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांना आता मी विनंती करतो की, त्यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेचा विषय या नियमामध्ये कसा बसतो या संदर्भात त्यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे.

**सभापती** : मी कोणत्याही सन्माननीय सदस्यांना पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन किंवा पॉईन्ट ऑफ ऑर्डर उपस्थित करण्यासाठी परवानगी देणार नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, काल पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यामध्ये निंबोडी या गावामध्ये आपल्या राज्याच्या माननीय उप मुख्यमंत्र्यांचे वक्तव्य

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना मी सांगू इच्छितो की, सभागृहाच्या नेत्यांना नियम 47 अन्वये या सभागृहामध्ये निवेदन करता येते का असा मघाशी मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्यावर मी माझा निर्णय दिल्यानंतर सन्माननीय उप मुख्यमंत्री यांनी त्यांचे निवेदन केलेले आहे. सभागृहामध्ये गोंधळाचे वातावरण असले तरी त्यांनी केलेले निवेदन मी ऐकलेले आहे आणि सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनीही ऐकलेले आहे. आता सन्माननीय विरोधी पक्ष नेते नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी उभे आहेत. त्यांचे म्हणणे सन्माननीय सदस्यांना ऐकावे लागेल. त्यांनी त्यांचे म्हणणे मांडल्यानंतर सन्माननीय सदस्यांना त्याबाबत बोलावयाचे असेल तर मी आपल्याला नंतर बोलण्याची संधी देईन.

2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आपण म्हणालात की,........

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मेटे यांना मी सांगू इच्छितो की, मी आपल्याला परवानगी दिलेली नाही.  आपण कृपया खाली बसावे.  सन्माननीय सदस्यांना मी खाली बसा म्हटल्यानंतर त्यांनी खाली बसावयाचे असते.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय,....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, काल निंबोडी येथे.......

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय...

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना मी बोलण्याची परवानगी देतो.  त्यांच्या वक्तव्यामध्ये जर काही चुकीचे आले तर मी ते कामकाजातून काढून टाकीन.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आपण या सदनाच्या नेत्यांना निवेदन करण्याची परवानगी दिल्यानंतर त्यांनी निवेदन केलेले आहे. आपण नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेतील विषय वाचून दाखविलेला आहे. त्यामध्ये असलेल्या मुद्याचे स्पष्टीकरण सभागृहाच्या नेत्यांनी आपल्या निवेदनात  केलेले असल्यामुळे हे निवेदन त्या घटनेबाबत पुरेसे असल्यामुळे आता त्यावर चर्चा करण्याचा कोणताही मुद्दा राहिलेला नाही.  त्यामुळे त्यासंबंधी चर्चा करण्याचा प्रश्न उरत नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.  आज सकाळ पासून या सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालले पाहिजे हे सांगण्यासाठी नियमांचे पुस्तक हातामध्ये घेऊन बोलले जात आहे. नियम वाचून दाखले दिले जात आहेत. एखाद्या मंत्री महोदयांनी किंवा सन्माननीय सदस्यांनी  सभागृहात निवेदन केल्यानंतर त्यावर सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारता येतात किंवा प्रतिक्रिया व्यक्त करता येतात काय याबाबतचे प्रोसिजर आपण आम्हाला समजावून सांगावे. सभापती महोदय, आपण त्यांना बोलण्याची परवानगी दिल्यानंतर आम्हालाही आमचे म्हणणे मांडण्याची संधी द्यावी.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : एखाद्या मंत्र्यांनी किंवा सदस्यांनी या ठिकाणी निवेदन केल्यानंतर त्यावर अन्य प्रश्नोत्तरे होत नाहीत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांच्या इंदापूर तालुक्यातील निंबोडी गावामध्ये राज्याच्या उप मुख्यमंत्री महोदयांनी जे वक्तव्य केले ते मी या ठिकाणी उच्चारु शकत नाही....

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सर्वात प्रथम मला "यू टयूब"वर हे पहायला मिळाले. हे "यू टयूब"वर पाहिल्यानंतर हे माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांचे वक्तव्य असूच शकत नाही असे वाटले. ते सभागृहामध्ये असे बोलले की, आम्ही शाहू, फुले, आंबेडकर, यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक यांचे नाव घेतो. त्यांचे नाव घेऊन राजकारणामध्ये काम करीत असताना सामाजिक बांधिलकीचे व्रत घेऊन लोकांचे प्रश्न सोडवायला पाहिजे अशा प्रकारचे मार्गदर्शन त्यांनी सातत्याने केलेले आहे आणि आम्ही त्याच मार्गाने पुढे जात आहोत. सभापती महोदय, शाहू, फुले, आंबेडकरांचा हाच मार्ग आहे काय ? छत्रपती शिवाजी महाराजांचा हाच मार्ग आहे काय ? ....

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज हे नियमाने चालते. आपण एकदा निर्णय दिल्यानंतर कोणालाही हरकत घेता येत नाही. आपण निर्णय दिल्यानंतर हरकत घेणे अनुचित आहे....... आपण निर्णय दिल्यानंतर सभागृहातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांना हरकत घेता येत नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन आपापल्या जागेवर शांत बसावे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईण्ट ऑफ प्रोसिजर आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी हा विषय नियम 289चा कसा होतो ते सांगावे व त्यास आपण मान्यता दिल्यानंतर तो विषय पुढे मांडावा.

श्री. जयंत प्र. पाटील : राज्याच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. हा विषय मांडण्यासाठी अधिक वेळ द्यावा.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे....

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय विरोधी पक्षनेते पुढे बोललेच नाहीत...

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी हा नियम 289चा विषय कसा होतो या मर्यादेतच मुद्दा मांडावा.

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन शांत बसावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिली आहे. हा नियम 289चा विषय कसा होतो हेच मी सांगत आहे. हा नियम 289चा विषय कसा होतो हे मी सांगू नको का ?

**सभापती** : हा नियम 289चा विषय कसा होतो हे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगावे आणि मी परवानगी दिल्यानंतर त्यांनी नियम 289वर बोलावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, नियम 289 अन्वयेची सूचना मी आपणाकडे लिहून दिली. आपल्याकडे नियम 289 अन्वयेचे रोज 25 विषय येतात. आज नियम 289अन्वये कोणता विषय सभागृहापुढे आहे त्याचा मी उल्लेख करु नको का ? सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे.

**सभापती** : आपणास निश्चितच संरक्षण दिले जाईल.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सत्ताधारी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.विनोद तावडे : काल हे बोलायला पाहिजे होते.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**Chairman** : Plese sit down.

(दोन्ही बाजूचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 289 च्या सूचनेनुसार जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे ती वाचून दाखवायची नाही का?

**सभापती** : ती आपण वाचून दाखवा.

श्री.विनोद तावडे : हा नियम 289 अन्वयेच्या सूचनेमध्ये जे लिहिले आहे तेवढा मजकूर या ठिकाणी वाचून दाखवितो. तो प्रस्तावातील मजकूर वाचावयास परवानगी आहे का?

**सभापती** : नियम 289 अन्वयेचा विषय कसा होतो हे आपण सभागृहाला सांगावे.

(दोन्ही बाजूचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाचे सदस्य आज सभागृहात जे बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत हे जर काल बोलले असते तर माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार साहेबांना माफी मागावी लागली नसती. त्यांनी माफी मागितली.

(दोन्ही बाजूचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**सभापती** : माननीय संसदीय कार्यमंत्री यांनी माननीय सदस्यांना जागेवर बसावयास सांगावे. Please sit down.

(विरोधी पक्षाचे काही माननीय सदस्य सभापतींच्या आसनासमोरील मोकळ्या मार्गिकेमध्ये उभे राहून माननीय सभापतींशी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात व विरोधी पक्षाचे काही माननीय सदस्य वेलमध्ये बसलेले असतात)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय संसदीय कार्यमंत्री उपस्थित आहेत. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील उपस्थित आहेत. असे असताना हा प्रकार जाणीपूर्वक चालला आहे का? विरोधकांना सभागृहात बोलू द्यायचे नाही का?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, एकदा या विषयावर सभागृहात चर्चा झाल्यानंतर किंवा हा मुद्दा उपस्थित झाल्यानंतर सभागृह नेत्यांनी माफी मागितल्यामुळे या विषयावर पडदा पडला आहे. असे असताना नाहक सभागृहात वेळ घेतला जात आहे. विरोधकांना सभागृहाचे कामकाज चालू द्यायचे नाही. माफी मागितल्यानंतर हा विषयच संपला आहे.

(दोन्ही बाजूचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**सभापती** : सभागृहातील परिस्थिती लक्षात घेता मला कामकाज चालविणे अशक्य असल्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.43 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी : माननीय सभापती)**

**सभापती** : सभागृहाची बैठक व्यवस्थित चालविणे ही सत्तारूढ व विरोधी या दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांची जबाबदारी आहे. माझी दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांना या संदर्भात विनंती आहे. सभागृहातील कामकाज अत्यंत शांततेने चालणे गरजेचे आहे. मघाशी आपण आपापल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यामुळे आता सभागृहाची बैठक व्यवस्थित चालणे गरजेचे आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली असून ते आता त्या अनुषंगाने आपले विचार मांडतील.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मला आपल्या निदर्शनास एक बाब आणून द्यावयाची आहे.

**सभापती** : सभागृहातील कामकाजाबाबतच्या नियमांबाबत मी एकदा सर्वांना बोलावून चर्चा करणार आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, एक महत्त्वाची घटना घडली आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी आपणास बोलण्यास संधी दिलेली नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना सभागृहाच्या बाहेर काढावे.

(सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना पुन्हा सांगू इच्छितो की, मी आपणास बोलण्यास संधी दिलेली नाही.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, आपण सभागृहात कसे वागले पाहिजे, त्या संबंधीचा विषय आहे. हा विषय वेगळा असून मला त्यावर बोलावयाचे आहे. त्यामुळे आम्ही परवानगी मागत आहोत.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना पुन्हा सांगू इच्छितो की, मी आपणास बोलण्यास संधी दिलेली नाही. मी माननीय उप मुख्यमंत्री श्री अजित पवार यांना निवेदन करण्यास परवानगी दिली होती. मी त्या संदर्भात निर्णय घेतला होता. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना नियम 289 चा विषय कसा होतो, हे मांडण्यास परवानगी देणे आणि सभागृहात पोषक वातावरण तयार करणे, हे माझे काम आहे.

( नंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...
असे शब्द असतील तर ते मी कामकाजातून टाकून टाकतो.

श्री.विनायकराव मेटे : सभापती महोदय.....

**सभापती** : सदनाचा सभापती या नात्याने मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सांगू इच्छितो की, त्यांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यावेळी मी यु-टयुब वर पहिल्यांदा हे वक्तव्य वाचले तेव्हा ते माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचे वाटलेच नाही. याचे कारण माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हे नेहमी "आम्ही शाहू, फुले, आंबेडकर, श्री.यशवंतराव चव्हाण, श्री.वसंतराव नाईक यांचे नाव घेतो. आमच्या वडिलधाऱ्यांनी राजकारणामध्ये काम करीत असताना सामाजिक बांधिलकीचे व्रत लक्षात घेऊन लोकांचे प्रश्न सोडविण्याचे सातत्याने काम केलेले आहे, अशा प्रकारचे ते वक्तव्य करतात. आपण श्री.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष नुकतेच साजरे केले असून आता श्री.वसंतराव नाईक यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत आहोत. त्यांनी या राज्याला आदर्श घालून दिलेला आहे. त्यानुसारच सत्ताधारी आणि विरोधी बाजूकडील सन्माननीय सदस्य काम करीत आहेत. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांचे वक्तव्य आल्यानंतर महाराष्ट्रातील वातावरण सभ्यतेच्या दुष्काळाने पोळले. तोडले अकलेचे तारे..... (अडथळा).... सभापती महोदय, महाराष्ट्रात हे जे वातावरण निर्माण झाले आहे त्यासंबंधी एका वर्तमानपत्राने यूरिन घोटाळा असा शब्द प्रयोग केला आहे. विधान मंडळाचे अधिवेशन सुरू असल्यामुळे दुष्काळग्रस्त भागातील लोकांसाठी सरकारने दोन अश्रू ढाळले असते तर त्या भागातील लोकांना बरे वाटले असते, अशी जनतेची अपेक्षा होती.

विधानमंडळाचा अमृत महोत्सव साजरा करताना अशा प्रकारचे वक्तव्य सत्ताधारी पक्षातील एका माननीय मंत्र्यांनी केल्यामुळे राज्यातील जनतेला त्याची लाज वाटते. हा अतिशय संवेदनशील विषय आहे. महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे जनतेमध्ये या शासनाविषयी, राजकीय व्यवस्थेसंबंधी प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवून माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी वक्तव्य करून जो अवमान केला त्यासंबंधी सभागृहात चर्चा झाली पाहिजे असे मला वाटते.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय.....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना बोलण्यास अनुमती दिलेली नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, कोणते वाक्य बोलावे, कोणते वाक्य बोलू नये...

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी तेच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांच्यासह अन्य माननीय सदस्य काय बोलले आहेत हे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सांगू इच्छितो की,.....

श्री.विनोद तावडे (बसून) : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सांगू इच्छितो की, माननीय सभापती उभे असताना सन्माननीय सदस्यांनी बसले पाहिजे असे त्यांच्या हातामध्ये असलेल्या नियम पुस्तिकेमध्ये लिहिलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहात काय बोलावे,कोणत्या भावना व्यक्त कराव्यात हे सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य आता आम्हाला शिकवायला लागले तर कसे होईल ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त कराव्यात आणि त्यांनी आम्हाला देखील आमच्या भावना व्यक्त करू द्याव्यात.

यानंतर श्रीमती रणदिवे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,काल इंदापूर तालुक्यात माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांच्या मतदार संघामध्ये काळू-बाळूच्या तमाशामध्ये ज्या पध्दतीने वक्तव्य होते, तसे वक्तव्य राज्यकर्त्यांकडून .......

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मलाही बोलण्यासाठी परवानगी द्यावी. सदनामध्ये जे काही घडलेले आहे . . . .

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे बरोबर नाही. आपण हतबल दिसत आहात.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी तुम्हाला गांभीर्याने सांगितले आहे की, या सदनामध्ये आक्रमक विचार मांडत असताना अन्य सन्माननीय सदस्यांनी येथे शिस्त पाळली पाहिजे. तसेच अन्य सन्माननीय सदस्य आपला मुद्दा मांडत असताना ते शांतपणे ऐकून घेतले पाहिजे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, . . .

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना सांगू इच्छितो की, मी त्यांना योग्य वेळी बोलण्यासाठी परवानगी देणार आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी परवानगी द्यावी.

**सभापती** :सन्माननीय सदस्यांनी थोडे थांबावे.यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छितो की, त्यांनी हा विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेचा कसा होतो ते सांगावे आणि ते सर्व सन्माननीय सदस्यांना ऐकून घ्यावे लागेल.

(सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी कोणता शब्द वापरला?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण ग्रामीण भागातून आला आहात आणि मी देखील ग्रामीण भागातून आलो आहे.

**सभापती** : जर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सभागृहाचे कामकाज पुढे सुरुच करावयाचे नसेल तर सभापती म्हणून माझ्याकडे एकच मार्ग आहे. परंतु तो अंतिम मार्ग आहे असे मानणाऱ्यापैकी मी नाही. यातील महत्वाचा जो भाग होता तो म्हणजे माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार साहेबांनी सदनामध्ये निवेदन करण्याबाबत परवानगी द्यावी अशी माझ्याकडे विनंती केली होती. जर कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी कधीही अशा प्रकारची विनंती केली तर आपण संबंधितांना प्राधान्याने त्यासाठी परवानगी देतो. त्याबाबत जो वाद झाला तो देखील आपण

. . . .ओ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** . . . .

याठिकाणी चर्चेतून सोडविला. त्यानंतर मग मी याबाबतीत माझा निर्णय देऊन या वादावर पडदा देखील टाकला. हे सर्व झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी जी 289 चा प्रस्तावाची सूचना दिलेली आहे, तो विषय 289 चा कसा होऊ शकतो याबद्दल माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी आपले मत मांडले आणि त्यानंतर मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना म्हणणे मांडण्याची संधी दिली.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सदर विषय नियम 289 अन्वये प्रस्तावचा कसा होतो ते सांगितलेले नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी पुन्हा सांगू काय ?

श्री.विनायक मेटे : सन्माननीय सदस्यांनी हा विषय नियम 289 अन्वयेचा कसा होतो हे सांगितले नाही.

श्री.विनोद तावडे :सभापती महोदय,मी सन्माननीय सदस्यांना पुन्हा सांगावयास सांगू काय?

**सभापती** : माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ साहेब, हा विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा होऊ शकतो किंवा कसा होऊ शकत नाही याबाबत सन्माननीय सदस्य त्यांचा जो विचार आहे तो ते मांडण्याचा प्रयत्न करणार आहेत. परंतु शेवटी सभापती म्हणून मी याबाबतीत निर्णय घेणार आहे. जर ही बाब योग्य असेल तर मी "होय" सांगेन आणि जर ही बाब योग्य नसेल तर "नाही" सांगेन. म्हणून माझे असे मत आहे की, सदनामध्ये दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी शांतता पाळली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेबांचे म्हणणे आहे की, ज्यावेळी सभागृह तहकूब झाले, त्या दरम्यानच्या काळामध्ये जर काही चर्चा किंवा भाष्य झाले असेल तर ते मी सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर ऐकणार आहे. पण याचा अर्थ सन्माननीय सदस्यांनी जोरात बोलावे, अन्य सन्माननीय सदस्यांनी त्याला साथ द्यावी आणि सभागृहात पूर्णत: गोंधळाचे वातावरण निर्माण व्हावे अशी आपली परंपरा नाही. ठीक आहे, काही वेळेला उद्रेक होतो.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : आपल्या बाबतीत तर कोर्टामध्ये खटले होतात.

**सभापती** : ठीक आहे. ते अज्ञान आहे.सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना सांगू इच्छितो की, ते सन्माननीय सदस्य शेलार यांचे अज्ञान आहे एवढेच मी मानतो. ते जेव्हा बोलले तेव्हा मी त्यांच्याकडे आणि ते माझ्याकडे बघत होते आणि त्या अवस्थेमध्ये ते बोलले. ठीक आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आज महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेमध्ये आहे. दुष्काळग्रस्त भागातील लोकांना पाणी देण्यामध्ये राज्य शासन हतबल झालेले आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी शासनासमोर उपोषणास बसले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ पंचायत समितीचे सदस्य श्री. देशमुख हे मागील दोन महिन्यांपासून आझाद मैदानावर उपोषणास बसले आहेत. महात्मा गांधी यांच्या विचाराने चालणारे शासन गांधी मार्गाने उपोषणास बसलेले श्री.देशमुख यांची टिंगळटवाळी करीत असतील तर ते महाराष्ट्राला शोभनीय नाही. आपल्या सर्वांना लोकप्रतिनिधी म्हणून शरमेने मान खाली घालावी लागेल इतकी ती वाईट वक्तव्ये आहेत. इलेक्ट्रॉनिक मीडियाने देखील काही वाक्ये वगळून बातमी दाखविली आहे. मीडियाला सुध्दा ती वक्तव्ये दाखविणे शोभनीय वाटत नाही अशा पध्दतीची वक्तव्ये राज्यकर्ते करायला लागले तर महाष्ट्रातील जनतेने कोणाकडे पहावे अशी परिस्थिती राज्यामध्ये निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, या सभागृहातून कोणता संदेश महाराष्ट्राला मिळणार आहे याकडे महाराष्ट्रातील तमाम जनता पाहत आहे. त्यासाठी मी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

सभापती महोदय, स्त्रियांच्या बाबतीत ती वल्गर वक्तव्ये आहेत. अशी वक्तव्ये राज्याला खऱ्या अर्थाने चिंतेची बाब आहे.

सभापती महोदय, मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, काळ-बाळू तमाशा फिरताना ज्या पध्दतीने वक्तव्ये केली जातात तशी वक्तव्ये राज्यकर्ते स्त्रियांच्या बाबतीत करायला लागले तर ते योग्य नाही.

(सत्ताधारी पक्षातील अनेक सदस्य जागेवर उभे एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

काळू-बाळू काहीतरी सभ्यतेने बोलतात पण त्यापेक्षाही ही वक्तव्ये भयानक आहेत. मी आपले आभार मानणार आहे..

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छितो की, आपल्या भाषणातील आक्षेपार्ह वक्तव्ये सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात येत आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझ्या भाषणात मी कोणता असंसदीय शब्द वापरला ? तमाशा ही राज्याची संस्कृती आहे. आपण कोणता शब्द काढणार आहात ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण आपल्या भावना व्यक्त करीत असताना एक उदाहरण दिले. तमाशा ही महाराष्ट्राची संस्कृती आहे ही वस्तुस्थिती आहे. आक्षेपार्ह वक्तव्य करुन जर कोणाच्या भावना दुखवल्या जात असतील तर तेवढे वक्तव्य मी सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझे वाक्य पूर्ण झालेले नाही. त्याच्यापेक्षाही वाईट वक्तव्ये झालेले आहे असे माझे म्हणणे आहे. काळू-बाळूचा काही संबंध नाही. (अडथळा). मी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवर माझे विचार मांडताना त्यामध्ये अडथळा आणला जात आहे. मी हतबल आहे, आपण हतबल आहात. आम्ही काय बोलतो ते त्यांना रेकॉर्डवर आणायचे नाही.

सभापती महोदय, आपण या सभागृहात अनेक वर्षापासून काम करीत आहात. त्यांना आमचे वक्तव्य रेकॉर्डवर आणायचे नाही. माझी आपणास विनंती आहे की, आजच्या कामकाजपत्रिकेवरील सर्व कामकाज बाजूला ठेवून आम्ही नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवर प्रदीर्घ चर्चा झाली पाहिजे. राज्यातील जनता पाण्यासाठी रस्त्यावर येत असेल, शासनाकडे पाणी मागत असेल तर त्यांना काही बोलण्याचा अधिकार नाही काय, त्यांना गांधी मार्गाने जाण्याचा अधिकार नाही काय, त्यांना सत्याग्रह करण्याचा अधिकार नाही काय ?

सभापती महोदय, आपण स्वत: गांधीवादी विचारांचे आहात. कोणी गांधी मार्गाने सत्याग्रह करीत असेल आणि त्यांना राज्यकर्ते थांबवत असतील तर शासन हतबल झालेले आहे. तेव्हा हतबल राज्यकर्त्यांनी राजीनामा दिला पाहिजे. त्यांनी राजीनामा का दिला पाहिजे हे सांगण्यासाठी नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेवर चर्चा झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बोर्डे....

श्रीमती विद्या चव्हाण : महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, सर्व कामकाज बाजूला ठेवून 289 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा घ्यावी. माननीय श्री.अजितदादा पवार काय बोलले असतील त्यावर चर्चा करुन तो विषय उगाळण्यात अर्थ नाही. त्यांनी या विषयी माफी मागितलेली आहे. शुक्रवार, दि.4 एप्रिल, 2013 रोजी मुंब्रा येथे इमारत कोसळून त्यात 67 व्यक्ती मृत्युमुखी पडल्या. त्यानंतर दि.5 एप्रिल, 2013 रोजी दिवसाचे सर्व कामकाज बाजूला ठेवून आपण त्या विषयावर चर्चा केली गेली. आजच्या दिवसाचे कामकाज सुध्दा माननीय उप मुख्यमंत्र्यांनी माफी मागितल्यानंतर पुन्हा तहकूब केले जाणार असेल तर ते योग्य नाही. आम्ही या ठिकाणी कामकाज करण्यासाठी येतो. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले की, माननीय श्री.अजितदादा पवार हे स्त्रियांच्या बाबतीत काही तरी बोलले. परंतु ते काहीही बोलले नसताना विनाकारण पराचा कावळा केला जात असेल तर ते बरोबर नाही. आम्ही या गोष्टींचा निषेध करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपणास रेकॉर्डवरुन काढून टाकावे लागेल असे एकही वाक्य मी उच्चारणार नाही. आपण मला बोलण्यास परवानगी दिली त्याच वेळी आपण सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांना सुध्दा हरकतीचा मुद्दा मांडण्यास संधी दिल्यामुळे एकप्रकारे मला बळ प्राप्त झाले आहे. त्यांनी हरकतीच्या मुद्याद्वारेच माझा मुद्दा मांडला आहे. त्यांनी म्हटले की, या सभागृहाला चर्चेचा अधिकार आहे की नाही ?

महोदय, आपण सकाळी निर्णय दिला की, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हे या सभागृहाचे नेते असल्यामुळे त्यांना नियम 47 अन्वये निवेदन करण्याचा अधिकार प्राप्त होतो. परंतु माझ्या सभागृहाच्या नेत्याच्या हातून काही घडले असेल तर त्याबद्दल सभागृहाच्या भावना व्यक्त झाल्या पाहिजेत, ही आमची अधिकृत भूमिका असू शकते. त्या कोणत्या स्वरुपात व्हाव्यात हा वेगळा भाग आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी सांगितले की, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी माफी मागितल्यानंतर त्या विषयावर आता काही बोलू नका. हा त्यांच्या भावनेचा एक भाग झाला. याचाच अर्थ माननीय उप मुख्यमंत्री माफी मागण्या इतपत बोलले आहेत हे सभागृहाच्या पटलावर आणल्याबद्दल मी सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. परंतु माझ्या भावना वेगळ्या स्वरुपाच्या आहेत.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, मी शांतपणे, पध्दतशीरपणे, कोणाच्याही भावना न दुखविता बोलत असेल तर मला अशा प्रकारे अडवू नका, जर चुकून काही बोललो तरच अडवा. सभागृहाच्या नेत्यांनी माफी मागण्याएवढे काही केले आहे काय, अशा जर आमच्या भावना झाल्या असतील तर त्या व्यक्त करण्याची आमची भूमिका आहे. त्या पुढे जाऊन आमची भूमिका आहे. भविष्यात अशा प्रकारे कोणाचा अवमान होईल असे सरकारने वागू नये ही भावना व्यक्त होण्यासाठी आपल्याकडून आम्हाला निर्णय हवा आहे. कोणाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची आमची भावना नाही. मी काल माझी भावना मांडलेली आहे. हे सभागृह सर्वोच्च सभागृह आहे. विधिमंडळ हे लोकशाहीचे मंदिर आहे. या मंदिरामध्ये काही जण ज्या सार्वजनिक गोष्टी करतात त्याचा येथे उच्चार करुन सभागृहाचे पावित्र्य बिघडवायचे काय हा मला प्रश्न पडतो. म्हणूनच मी काल एका चित्रवाहिनीवर सांगितले की, हा माझा चर्चेचा विषय होत नाही. परंतु सभागृह हे सर्वोच्च मंदिर असल्यामुळे अशा चर्चेला वाव द्यायचा की नाही या बाबत आम्हाला विचार करावा लागेल.

माझे मत असे आहे की, माननीय उप मुख्यमंत्री हे आमच्या सभागृहाचे नेते आहेत. आपण त्यांना या सदनामध्ये त्या संदर्भात बोलण्यास वाव देऊन आमच्या प्रस्तावाला खूप बळ दिले आहे. त्यांनी ज्या गोष्टीसाठी माफी मागितली ती अयोग्य गोष्ट होती. त्यामुळेच त्यांच्यावर माफी मागण्याची वेळ आली. माझ्या सभागृहाच्या नेत्यावर माफी मागण्याची वेळ आली असेल तर मला माझ्या भावना व्यक्त करण्याचा पूर्ण अधिकार आहे. म्हणून आपण आमच्या म.वि.प.नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेला मान्यता द्यावी. या प्रस्तावावर आम्ही खूप चर्चा करावी, ही बाबही योग्य नाही. मला वाटते आपण या प्रस्तावावरील चर्चा मर्यादित ठेवावी माझी एवढीच विनंती आहे की, आपण 289 च्या प्रस्तावाला मान्यता द्यावी.

सभापती महोदय, यातून अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, सभागृहाच्या सर्वोच्च नेतृत्वाकडून सबंध महाराष्ट्रामध्ये आमच्या सभागृहाचा जो सन्मान झालेला आहे त्यामुळे त्यांनी या जागेवर सुध्दा बसू नये. त्यांनी माफी नव्हे तर राजीनामा द्यावा अशा भावना व्यक्त करण्यासाठी आपण आम्हाला संधी द्यावी, एवढीच मी विनंती करतो.

नंतर श्री.खंदारे....

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, विधानपरिषद नियमावलीतील नियम क्रमांक 289 मध्ये अशी तरतूद आहे की, "कोणत्याही सदस्यास सभापतींच्या संमतीने कोणताही नियम विधानपरिषदे पुढील कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करताना स्थगित करण्यात यावा असा प्रस्ताव मांडता येईल आणि प्रस्ताव संमत झाला तर, संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल."

सभापती महोदय, या सभागृहाच्या नेत्यांनी आपल्या निवेदनामध्ये माफी मागितल्यानंतर त्या निवेदनाबाबत मी टिपणी करीत नाही. मात्र त्यांना माफी मागावी लागावी लागली त्यामुळे काही तरी भयंकर घडलेले आहे आणि ते या सभागृहामध्ये पहिल्यांदा समोर आलेले आहे. आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी सुध्दा माफी मागितलेली आहे. ते या राज्याचे अत्यंत सुसंस्कृत नेते आहेत. माननीय यशवंतराव चव्हाण यांच्यापासून ते माननीय वसंतराव नाईक, माननीय वसंतदादा पाटील, माननीय शरदराव पवार, माननीय विलासराव देशमुख यांच्यापर्यंत या राज्याची परंपरा आहे. आपली सभ्यता व सुसंस्कृतता सार्वजनिक जीवनात व व्यक्तिगत जीवनात या नेत्यांनी कधीही सोडलेली नव्हती. माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या तोंडून नकळत हे वाक्य गेलेले आहे. त्याचा घोर त्यांनी केलेल्या निवेदनातून स्पष्टपणे दिसत आहे. ते निवेदन आपल्या परवानगीनुसार सर्वांसमोर आलेले आहे. त्यामुळे ते निवेदन स्वीकारणे भाग आहे. त्या निवेदनातून अत्यंत दोन गंभीर बाबी समोर आलेल्या आहेत. त्याची चर्चा सुध्दा या सभागृहात झाली पाहिजे. गेल्या 2-3 आठवड्यामध्ये चर्चा करीत असताना हे मान्य केले आहे की, राज्यातील अर्ध्याहून अधिक महाराष्ट्र दुष्काळाने होरपळत आहे. आता सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी केलेल्या निवेदनातही त्यांनी सांगितलेले आहे. तसेच त्यांनी बाहेर जे तथाकथित वक्तव्य केलेले आहे. त्याचा उच्चार या सभागृहात किंवा सभागृहाच्या बाहेर कोणताही सुसंस्कृत माणूस करणार नाही. ते वक्तव्य करीत असताना किंवा त्याची पार्श्वभूमी सांगत असताना त्यांनी काय सांगितले की, धरणामध्ये टिपूसभरही पाणी नाही. याचा अर्थ तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही आणि ती वेळ आम्ही आणलेली आहे. अशा प्रकारचे भयंकर वक्तव्य सभागृहाच्या नेत्यांनी केलेले आहे.

( सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी कृपया खाली बसावे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना देऊन या विषयावर चर्चा करण्याची मागणी केलेली आहे. मी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना असे आवाहन करतो की, सदनाचे कामकाज चालविण्याच्या दृष्टीकोनातून दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी काही भूमिका घेणे आवश्यक आहे. सभागृहाच्या बाहेर केलेल्या वक्तव्याबद्दल त्यांनी बाहेर व सभागृहातही दिलगिरी व्यक्त केलेली आहे, माफी मागितलेली आहे. त्या वक्तव्याच्या खोलामध्ये जाण्याची आवश्यकता नाही. परंतु बऱ्याच वेळेला कोणतेही वक्तव्य कोणी केले यालाही महत्व असते. जनतेच्या आमच्याकडून अधिक अपेक्षा आहेत. असेच वक्तव्य महाराष्ट्रामध्ये जर अन्य व्यक्तीकडून केले असते तर ती त्यांची शैली आहे असे सांगून त्यांचा गुणगौरव झाला असता. त्याबद्दल ना कोणी माफी मागण्याचा आग्रह धरला असता ना कोणी टीका केली असती. पण आमच्याकडून लोकांच्या अधिकच्या अपेक्षा असल्यामुळे अशी आग्रही मागणी झाली आहे. जनमताचा व माध्यमांचा कानोसा घेऊन, भावना लक्षात घेऊन याबद्दल काल व आज सभागृहाच्या बाहेर वक्तव्य केलेले असताना सुध्दा त्यांनी या सभागृहात माफी मागितलेली आहे. भाषणाच्या ओघामध्ये अनेक नेते अनेक पध्दतीची वक्तव्ये करीत असतात हे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनाही माहीत आहे. (अडथळा) नियम 289 अन्वये चर्चा का स्वीकारु नये हे मी सांगत आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी खाली बसावे. नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना नियमात कशी बसते हे सन्माननीय सदस्यांकडून सांगितले जाते. जेव्हा तो विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा कसा होत नाही हे मांडले जाते,

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती**...

तेव्हा तो विषय 289 नुसार प्रस्ताव कसा योग्य आहे यावर सुध्दा आपले विचार मांडण्याची प्रथा आहे. मंत्री महोदय श्री. आर.आर.पाटील यांनी आता आपले वक्तव्य संपवावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझी आपणास एक विनंती आहे. विरोधी पक्षनेते तसेच सभागृहाचे नेते यांना बोलण्यासाठी प्राधान्य दिले जाते हे मला मान्य आहे. परंतु एक सन्माननीय सदस्य बोलत असताना त्यांना मध्येच थांबवून दुस-या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी कशी काय देता येते ?

**सभापती** : काही वेळेला असे केले तर तेही गैर नाही असे मला वाटते. याचे कारण असे की, जेव्हा सभागृहातील एखादे ज्येष्ठ मंत्री येथे येऊन आपले विचार मांडण्याची अपेक्षा व्यक्त करीत असतील तर अपवादात्मक परिस्थितीमध्ये, आता जसे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना थांबविण्यात आले तसे, सभापती सन्माननीय सदस्यांना थांबवू शकतात. मंत्री महोदय, श्री. आर.आर.पाटील यांनी आता आपले वक्तव्य संपवावे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझे सगळे ऐकल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचे मत परिवर्तन होईल आणि कदाचित त्यांना पुढे आपले मत मांडण्याची आवश्यकता भासणार नाही. सभापती महोदय, सभागृहाच्या बाहेरचे वक्तव्य आहे. तरी सुध्दा सभागृहामध्ये दिलगिरी व्यक्त केलेली आहे. ज्या विजेसंबंधी बोलले जाते...(अडथळा)...विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी आमचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे नाही तर त्यांचे देखील आम्ही काही ऐकून घेणार नाही. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांची अशी अपेक्षा आहे की, त्यांचे म्हणणे सर्वांनी ऐकून घेतले पाहिजे, तर मग आमचे देखील त्यांनी ऐकून घेतले पाहिजे. ते कोणाचे ऐकून घेत नसतील तर ते बरोबर नाही...(अडथळा) ..

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री. आर.आर.पाटील : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचा नेहमी असा आग्रह असतो की त्यांचे म्हणणे सर्वांनी शांतपणे ऐकून घेतले पाहिजे आणि त्यांनी मात्र कुणाचेच ऐकायचे नाही. म्हणजे एकट्यासाठी हे सभागृह आहे काय ? त्यांचे म्हणणे दुस-यांनी ऐकावे असे जर त्यांना वाटत असेल तर त्यांनी सुध्दा दुस-यांचे, समोरच्या बाजूचे म्हणणे ऐकले पाहिजे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : या सभागृहाच्या कामकाजाच्या नियमा प्रमाणे जेव्हा सन्माननीय सभापती उभे असतात त्यावेळी आम्ही या सभागृहातील कोणताही सदस्य मग तो कितीही ज्येष्ठ असला तरी त्याने आपल्या जागी बसले पाहिजे. सन्माननीय मंत्री महोदय, श्री. आर.आर.पाटील यांनी जो मुद्दा मांडला त्याकडे मी येतच होतो. जो मक्ता दुस-यांचा होता तो मक्ता तुमचा कधी झाला असा माझा प्रश्न आहे. दुस-यांचा मक्ता घेऊन त्या संस्कृतीत जाण्याचे राज्यकर्त्यांनी ठरवलेच असेल तर तो भाग वेगळा आहे. परंतु आमच्या अपेक्षा त्यांच्याकडून वेगळया होत्या.

निवेदनामधून दोन मुद्दे पुढे आलेले आहेत. एक म्हणजे या राज्यामध्ये पिण्यासाठी देखील पाणी आमच्याकडे नाही असे या सभागृहाच्या नेत्यांनी सभागृहामध्ये सांगितले. दुसरे म्हणजे, आता वीज देता येणार नाही त्यामुळे पुढचे जे काही चालेल तेही मला या सभागृहामध्ये बोलता येत नाही. मी सभ्यतेच्या आणि संस्कृतीच्या मर्यादा पाळणार आहे. पण हे दोन गंभीर प्रश्न सभागृहाच्या नेत्यांनी सभागृहामध्ये मांडले असतील तर त्या प्रश्नाव्यतिरिक्त अन्य प्रश्नावर चर्चा होऊ शकत नाही.

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना कशासाठी दिली जाते ? आपण कौल आणि शकधर यांचे पुस्तक पहावे किंवा आपण स्वत: जे निर्णय दिलेले आहेत तेही पहावे. सभापती महोदय, दुष्काळाच्या आणि ग्रामीण भागातील प्रश्नासंबंधी आपण सुध्दा अनेकदा हस्तक्षेप करुन त्या त्या प्रश्नावर स्वत:हून चर्चा सुचविलेली आहे. ही चर्चा माफीच्या संदर्भात नाही. पण या राज्यामध्ये पिण्यासाठी पाणी उरलेले नाही, वीज उपलब्ध नाही असे जर सभागृहाचे नेते सांगत असतील तर मग चर्चा कशाची करायची. सभागृह नियमाने चालते. हे राज्य सुसंस्कृतपणे आणि सभ्यतेने चालते. त्या सुसंस्कृतपणाचे आणि सभ्यतेचे नियम आपण न पाळण्याचे ठरविले असेल तर ते योग्य नाही. या सभागृहामध्ये एक सन्माननीय सदस्य बोलत असताना सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांकडून आरडाओरडा केला जाईल अशी माझी अपेक्षा नव्हती. सन्माननीय सदस्यांनी किमान ऐकायची तरी सवय करावी.....(अडथळा) माझे वक्तव्य संपले की नाही याचा निर्णय माननीय सभापती घेतील.

...नंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.........

नाही तर 2014 हे वर्ष जवळ आलेले आहे. जनता तुमच्या दोघांमध्ये फरक करणार नाही हे लक्षात घ्यावे. सभापती महोदय, राज्यातील या भीषण स्थितीबद्दल ताबडतोब चर्चेला सुरुवात करावी. कारण सभागृहाच्या नेत्यांनीच कबुली दिलेली आहे. अशी जर राज्याची स्थिती असेल तर या सभागृहात दुसऱ्या कोणत्याही विषयावर चर्चा करण्याची आवश्यकता नाही. माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांची माफी मागून सांगतो की, भीषण दुष्काळ आणि विजेची टंचाई याशिवाय दुसरा कोणताही महत्वाचा विषय असू शकत नाही. त्यामुळे सभागृहाचे सर्व कामकाज ताबडतोब स्थगित केले पाहिजे आणि या विषयावरील चर्चा सुरु केली पाहिजे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, गेल्या 64 दिवसापासून श्री.प्रभाकर देशमुख हे शेतकरी मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला बसलेले आहेत. त्यांनी माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांची दिनांक 22 मार्च, 2013 रोजी भेट घेतली होती. त्यांच्यासोबत माननीय विधानसभा सदस्या श्रीमती प्रणिती शिंदे व माननीय विधानसभा सदस्य श्री.भारत भालके हे होते. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी महसूल आयुक्त श्री.प्रभाकर देशमुख यांना बोलावले आणि आष्टीसाठी 3 टीएमसी पाणी सोडण्याचे नियोजन करावे आणि सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांना घेऊन कराडला भेटा..............

(सत्ताधारी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी कृपया खाली बसावे.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक माननीय सदस्य सभागृहात एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे भाषण पूर्ण झाले नाही म्हणून आपण मला खाली बसविले.....

(विरोधी पक्षाचे काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय सभापतींशी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**सभापती** : माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी कृपया खाली बसावे. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपले वक्तव्य सुरु करावे.

(दोन्ही बाजूचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

(विरोधी पक्षाचे काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय सभापतींशी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, श्री. प्रभाकर देशमुख हे शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी गेले 65 दिवस आझाद मैदानावर उपोषणाला बसलेले आहेत.

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली होती. त्या सूचनेच्या अनुषंगाने त्यांना मी म्हणणे मांडण्याची संधी दिली होती. माननीय विरोधी पक्षनेते व माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी या सूचनेच्या अनुषंगाने आपली मते या ठिकाणी मांडली आहेत. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये या अनुषंगाने कोणताही विषय नमूद केलेला नाही. त्यामुळे मी या दोन्ही सूचनांना माझी संमती नाकारीत आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या मंगळवार, दि□ां□ 09 एप्रिल, 2013 रोजी स□ाळी 10.00 ते 11.45 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक होईल. सदर बैठकीत या अधिवेशनातील प्रलंबित लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पु□ः भरेल.

( सभा□ृहाची बैठ□ दुपारी 02 वाजू□39 मि□िटां□ी मंगळवार, दि□ां□ 09 एप्रिल, 2013 च्या स□ाळी 10.00 वाजेपर्य□त स्थगि□ झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही